# कार्यालय नगर परिषद, ब्रम्हपुरी (जिल्हा-चंद्रपूर)

**MUNICIPAL COUNCIL BRAMHAPURI DIST-CHANDRAPUR**

Phone. 07177-272013

Email :- conagarparishad@gmail.com

क्रमांक : जा.क्र. नपब्र/नियोजन व विकास/2024/215 दिनांक :- 27/06/2024

प्रती,

मा. दुय्यम निबंधक
ब्रम्हपुरी

विषय :- मौजा- **ब्रम्हपुरी** भूमापण क्र. **४४७ आराजी १.२१** हे. आर. चे अभिन्यासमधील नगर परिषदेकडे विकास कामाकरीता राखून ठेवण्यात आलेले भुखंड मुक्त करणेबाबत.

संदर्भ :- १. या कार्यालयाचे आदेश क्र./नपब्र/नियोजन/अकृषक/२०१८/६१६, दिनांक ०५/११/२०१८
२.मा. सहायक संचालक चंद्रपूर यांचे सिमांकीत अभिन्यास अंतिम मंजुरी शिफारस क्र. २२४८, दि. ४/१०/२०१८
३.अभिन्यासधारक श्री. महेंद्र श्रावण बोकडे व इतर ७ रा. ब्रम्हपुरी यांचे या कार्यालयात प्राप्त अर्ज दिनांक २८/१२/२०२३

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, नगर परिषद क्षेत्रातील मौजा- **ब्रम्हपुरी** येथील भूमापण क्र. ४४७ आराजी १.२१ हे. आर. चे अभिन्यासास या कार्यालयाकडून संदर्भिय आदेश क्र. १ अन्वये रहिवास प्रयोजनार्थ विकास करण्यास मंजुरी देण्यात आले असून, मा. सहाय्यक संचालक नगररचना चंद्रपूर यांचे संदर्भिय आदेश क्र. २ अन्वये अभिन्यासला अंतिम मंजुरीकरीता शिफारस केलेली आहे.

सदरहू अभिन्यासमधील अंतर्गत रस्त्याचे खडिकरण करणे, नाली व सार्वजनिक विद्युतची व्यवस्था करण्याचे कामाची हमी म्हणून अभिन्यासधारकाने त्यांचे **मौजा- ब्रम्हपुरी भूमापण** क्र **४४७** चे अभिन्यासमधील भूखंड क्र. **०६, ०७, ०८, ०९ व १०** संदर्भ क्र. १ मधील आदेशातील अट क्र. १६ अन्वये अभिन्यासचे विकास कामाकरीता न. प. कडे राखून ठेवण्यात आले होते.

अभिन्यासधारकाने भूमापण क्र. **४४७** चे अभिन्यासमधील अंतर्गत रस्त्याचे खडिकरण, नाली व सार्वजनिक विद्युतची व्यवस्था करण्याचे काम पूर्ण केले असल्याने, सदरहू कामाची हमी म्हणून अभिन्यासधारकाने न. प. कडे राखून ठेवलेल्या भूमापण क्र. **४४७** चे अभिन्यासमधील भूखंड क्र. **०६, ०७, ०८, ०९ व १०** मुक्त करण्यात येत असून, सदर भुखंडाची विक्री करण्यास नगर परिषदेची हरकत नाही.

सबब कळविण्यात येत आहे.

कार्यालय, नगर परिषद ब्रम्हपुरी जिल्हा-चंद्रपूर

मुख्याधिकारी
नगर परिषद, ब्रम्हपुरी

प्रतिलीपी :-

**श्री. महेंद्र श्रावण बोकडे व इतर ७, रा. ब्रम्हपुरी यांना माहितीस रवाना.**

Scanned with OKEN Scanner